# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र - ७५ दिनांक - ०५/०३/२०२४

## ०८ किलो गांजासह एका ईसमास अटक – नवघर पोलीस ठाणेची कामगीरी

दिनांक २९/०२/२०२४ रोजी नवघर पोलीस ठाण्याचे दहशतवादी विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, एक इसम हा नवघर रोड येथे दिनांक २९/०२/२०२४ रोजी १४.०० वा. सुमारास गांजा हा अमली पदार्थ विक्री करिता येणार आहे.

प्राप्त माहितीच्या अनुषंगाने नवघर पोलीस ठाणे दहशतवादी विरोधी पथकातील पोउपनि/तुषार माळोदे, पोहवा/जावळे, पोशि/तडवी असे यांनी दोन पंचानसह सदर ठिकाणी सापळा रचुन छापा कारवाई केली असता इसम नामे अरविंद दिपक चौरसीया, वय २७ वर्षे, रा. विरार पुर्व यास ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत असतांना तो पळु लागला. त्यावेळी कौशल्याने त्यास ताब्यात घेऊन त्याच्या ताब्यात असलेली एक पिशवी तपासली असता त्यात ०८ किलो वजनाचा १,६०,०००/- रु. किंमतीचा गांजा हा अमली पदार्थ मिळुन आला म्हणुन त्यास ताब्यत घेऊन नवघर पोलीस ठाणे गु.र.नं. १३५/२०२४ एन.डी.पी.एस. ८ (क) २० (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढिल तपास पोउपनि/ तुषार माळोदे, हे करित आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१, मिरारोड पुर्व, श्री. राजेंद्र मोकाशी, सहाय्यक पोलीस आयुक्त, नवघर विभाग नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नवघर पोलीस ठाणे वपोनि/धिरज कोळी, पोनि/केदारे, पोनि/गोमते, सपोनि/धायगुडे, पोउपनि/माळोदे, पोहवा/जावळे व पोशि/तडवी यांनी केली आहे.



----oooo----